# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि.21/०9/2017.

## प्रेस नोट

## JCB मशीन चोरी करणारे आरोपीस गुन्हे शाखा पोलिसांनी केली अटक 07 लाख रुपये कि.चे JCB मशीन हस्तगत.

पोलीस स्टेशन दौलताबाद हद्दीतील माळीवाडा येथून दि.08/09/2017 रोजी फिर्यादी नामे गणेश भाऊसाहेब मुळे वय 35 वर्ष धंदा शेती रा.माळीवाडा औरंगाबाद यांच्या मालकीचा JCB मशीन क्रमांक MH-20-CH-6837, किमंत 07 लाख रुपयेचा कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला अशी फिर्याद दिल्यावरून पोलीस ठाणे दौलताबाद येथे कलम 379 भा.द.वि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हे शाखेच्या टीमने वरील गुन्ह्यात आरोपी व गेल्या मालाचा कसोशीने तपास करीत असताना माळीवाडा व त्या परिसरातील विविध ठिकाणचे CCTV कॅमेराची तपासणी केली त्यावरून माळीवाडा परिसरातून बाहेर जाणारे मुख्य रस्ताने आरोपीने मार्ग काढला असे समजले. गुन्हे शाखेच्या गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली कि, शंकर गायकवाड रा.पळसखेड ता.चिखली व त्याचा मालक राजेंद्र गुळवे रा.जेहूर ता.कन्नड हे दोघे मागील 10-12 दिवसापूर्वी एक पिवळ्या रंगाचा JCB रात्रीचे वेळी माळीवाडा येथून जाताना दिसले होते. अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावरून गुन्हे शाखे पथकाने तात्काळ गतीने तपासकाम करून आरोपी शंकर उत्तम गायकवाड वय 20 वर्ष रा.पळसखेड दौलत ता.चिखली जि.बुलढाणा यास ताब्यात घेवून अधिक विश्वासात घेवून विचारपूस केली असता त्याने सांगितले कि, त्याने व राजेंद्र गुळवे रा.जेहूर ता.कन्नड असे आम्ही दोघांनी माळीवाडा येथून रात्रीच्या वेळी पिवळ्या रंगाचे JCB मशीन चोरी केले आहे असे सांगितले. गुन्हे शाखेने दोन्ही आरोपितांना अटक केली असून आरोपींच्या ताब्यातून किमंत अंदाजे 07 लाख रुपये चे JCB मशीन जप्त केले आहे. आरोपीस पुढील तपासकामी मुद्देमालासह पोलीस ठाणे दौलताबाद यांच्या ताब्यात दिले. हि कामगिरी पोलीस आयुक्त श्री. यशस्वी यादव, पोलीस उप.आयुक्त (मुख्यालय) डॉ.दिपाली धाटे-घाडगे, सहा.पोलीस आयुक्त(गुन्हे) रामेश्वर थोरात, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मधुकर सावंत, सहाय्यक पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे, पोहेकॉ/संतोष सोनवणे, पोना/विजयानंद गवळी, सुधाकर राठोड, पोकॉ/लालखा पठाण, नंदलाल चव्हाण, योगेश गुप्ता, धर्मराज गायकवाड, सिध्दार्थ थोरात, नितीन धुळे, हिरासिंग राजपूत, नवाब शेख, वीरेश बने यांनी केली.

SD/-
(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर.